


महाराष्ट्रातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना (एन.आर.एच.एम.) मार्फत ई-फाईलिंग सुविधेच्या वापराने प्रशासन पारदर्शक व गतिमान होण्यास मदत होणार आहे. राज्यातील हा पहिलाच प्रकल्प असून टप्प्याटप्प्याने पुढील वर्षापासून संपूर्ण आरोग्य विभागात या प्रक्रियेचा अवलंब केला जावा, असे आवाहन आरोग्यमंत्री सुरेश शेट्टी यांनी केले.

मंत्रालयात मंगळवारी राज्य एनआरएचएमच्या ई-फाईलिंग पद्धतीचा शुभारंभ आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. आरोग्य राज्यमंत्री प्रा.फौजिया खान, आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव जयंतकुमार बाँठीया, सचिव भूषण गगराणी, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सचिव राजेश अग्रवाल, एन.आर.एच.एम.चे प्रकल्प संचालक विकास खारगे, माहिती व जनसंपर्क महासंचालक प्रमोद नलावडे, आरोग्य संचालक डॉ.चिंधे, माहिती व जनसंपर्क संचालक श्रद्धा बेलसरे आदींसह आरोग्य, माहिती तंत्रज्ञान विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

देशात पंतप्रधान कार्यालयानंतर ई-फाईलिंग पद्धतीचा वापर एनआरएचएमच्या महाराष्ट्र कार्यालयाने सुरु केला आहे. राज्यात अशा प्रकारचा हा पहिलाच प्रकल्प असल्याचे सांगून श्री.शेट्टी म्हणाले, आरोग्य विभागाचे आधुनिकीकरण केल्याने सेवांच्या दर्जात वाढ होणार आहे. ई-फाईलिंग प्रकल्पाचा पुढचा टप्पा म्हणजे पुढील वर्षापासून संपूर्ण आरोग्य विभागात या प्रकल्पाचा अवलंब करुन प्रशासन अधिक गतिमान करण्याचा आमचा प्रयत्न आहे. राज्यात एनआरएचएमचे काम प्रभावीपणे सुरु असून त्याची दखल केंद्रस्तरावर देखील घेण्यात आली असल्याचे गौरवोद्गार आरोग्यमंत्र्यांनी यावेळी काढले.

आरोग्य विभागाचे पुणे कार्यालय व मुंबई येथील एनआरएचएम कार्यालय ई-फाईल प्रकल्पांतर्गत नेटवर्कद्वारे जोडण्यात आले आहे. यामुळे संबंधित विभागाच्या फाईल्स फक्त इलेक्ट्रॉनिक्स पद्धतीनेच तपासून त्यावर कार्यवाही केली जाईल. त्यामुळे वेळेची बचत होण्यास मदत होईल, असे श्री.खारगे यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात सांगितले. ई-फाईल प्रकल्प टप्प्या-टप्प्याने जिल्हास्तरावर सुरु करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

या ई-फाईल प्रकल्पांत २५० वापरकर्ते असून प्रत्येकाला डिजीटल सही व डोंगल देण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे फायली गहाळ होण्यासारखे प्रकार घडणार नाहीत. प्रत्येक फाईलचा प्रवास समजण्यास मदत होण्याबरोबरच पेंडींग प्रकरणांची माहितीही एका क्लिकवर मिळणार आहे. या प्रक्रियेमध्ये ई-बँकींगचा वापरही मोठ्या प्रमाणावर केला जाणार आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते तसेच साहित्य पुरवठादारांची देयके आदी बाबींसाठी ई-पेमेंटचा वापर केला जात आहे.

यावेळी श्री.खारगे यांनी उपस्थित मान्यवरांना ई-फाईलिंग व ई-बँकींगचे ऑनलाईन प्रात्यक्षिकही करुन दाखविले. यावेळी आरोग्य व माहिती तंत्रज्ञान विभागाच्या अधिकाऱ्यांचा आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.